खडक पोलीस स्टेशन पुणे
दिनांक – २५/१०/२०१७

प्रेसनोट

-----------

**रिक्षातील प्रवाशांना लुटणारे तिघेजण जेरबंद अडीच लाखाचा ऐवज हस्तगत जबरी चोरी व इतर चोरीचे आठ गुन्हे उघड**

श्री शुभम बाबासाहेब पाटील वय-१९ वर्षे धंदा- शिक्षण रा.प्लॉट नं- ३६ आनंद निवास, राघवेंन्द्र नगर , खराडी, पुणे मुळगाव - मु.पो. लाडेगाव ता - वाळवा जि - सांगली हे ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरियल सोसायटीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग पुणे येथे मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे तृतिय वर्षात शिकत आहे ते दिनांक - २२/१०/२०१७ रोजी इस्लामपुर येथुन एस.टी. बसमध्ये बसुन स्वारगेट एस. टी. स्टॅन्ड येथे मध्यरात्री पोहचले रिक्षा शोधण्याकरिता स्वारगेट पोलीस स्टेशनच्या लगतच्या फुटपाथवर आले तेथे ते हडपसरकडे जाणा-या रिक्षा शोधत असताना एका रिक्षा ड्रायव्हरने त्यांना त्यांचे रिक्षामध्ये बसण्यास सांगीतले त्यारिक्षामध्ये अगोदरच प्रवासी म्हणुन दोन इसम बसले होते रिक्षा चालकाने रिक्षा शंकरशेठ रोडने लष्कर पुणे या भागात नेल्यानंतर रिक्षाचालक व रिक्षातील दोघांनी फिर्यादी यांना कटर व चाकु सारख्या हत्याराचा धाक दाखवुन त्यांचेजवळील रोख रक्कम जबरदस्तीने चोरली त्यावेळी फिर्यादी यांनी रिक्षाचा नंबर पाहुन सदरबाबत शंभर नंबरवर फोन करुन नियंत्रण कक्ष येथील पोलीसांना घटनेबाबत माहीती दिली होती त्यानुसार स्वारगेट जेधे चौक याठिकाणी सी आर पाच या मोबाईल गाडीवर डयुटीस असलेले पोलीस कर्मचारी संतोष आखाडे, अभय दिक्षीत, चालक गाढवे यांनी संशयावरुन रिक्षा नंबर एमएच१२/एसी११८६ ही ताब्यात घेवुन रिक्षाचालक नवाजिश नाजीर अन्सारी वय-१९ वर्षे धंदा - रिक्षा चालक रा - जनता वसाहत, मार्शल बेकरी जवळ,पुणे मुळ रा. नवादा ता. धामपुर जि.बिजनौर उत्तर प्रदेश व त्याचे साथीदार उमेर जाकीर अन्सारी वय-१९ धंदा- बेकरी कामगार रा. मुस्कान बेकरी, दत्तवाडी,पुणे. मुळ रा. पखनपुर ता.नगिणा जि.बिजनौर उत्तरप्रदेश व आफताब सल्लाउददीन अन्सारी वय-१९ धंदा- बेकरी कामगार रा - सिमला बेकरी, भोपळे चौक, कॅम्प पुणे. मुळ रा. नवादा ता. धामपुर जि.बिजनौर उत्तर प्रदेश. यांना पकडले आहे.

**आरोपीना विश्वासात घेवुन त्यांचेकडे सखोल तपास केला ते दिवसा बेकरी मध्ये काम करत होते व रात्रीच्या वेळी रिक्षामधुन प्रवास करुन पॅसेंजर म्हणुन प्रवाशांना बसवुन त्यांना निर्जणस्थळी नेवुन हत्याराचा धाक दाखवुन प्रसंगी मारहाण करुन त्यांचेकडील ऐवज जबरदस्तीने चोरत होते तसेच त्यांनी वेगवेगळया ठिकाणाहुन दुचाकी वाहने चोरी केल्याचे तपासात उघडकीस आलेले आहे .**

दिनांक – २१/१०/२०१७ रोजी मध्यरात्री श्री रोहीत धनाजी चव्हाण वय-२० रा - सुरज लॉज पीएमटी बस स्टॉपमागे पुणे मुळ रा - वालपुर उस्मानाबाद यांना स्वारगेट एसटी स्टँडसमोर आपले रिक्षात बसवुन रिक्षा शॉर्टकटने नेतो असे सांगुन त्यांना डिपी रोड म्हात्रे पुलाजवळ साई मंदीरसमोर नेवुन त्यांचे गळयाला चाकु लावुन जिवे मारण्याची धमकी देवुन त्यांचेजवळील रोख रुपये पाच हजार जबरदस्तीने चोरले आहेत त्याबाबत त्यांनी अलंकार पोलीस स्टेशन पुणे याठिकाणी तक्रार दिलेली आहे.

दिनांक – २२/१०/२०१७ रोजी मध्यरात्री वैभव सुनिल गोरे वय - २४ रा – कोरेगाव पार्क पुणे हे सातारा येथुन एसटी बसने स्वारगेट पुणे येथे आले असता त्यांना कोरेगाव पार्क येथे जाणे असल्याने रिक्षा शोधत असताना आरोपींनी त्यांना आपले रिक्षामध्ये सहप्रवासी म्हणुन बसवुन पुलगेट लष्कर पुणे येथे निर्जणस्थळी घेवुन जावुन लघवीच्या बहाण्याने रिक्षा थांबवुन त्यांचेजवळील चाकु व ब्लेडने दोन्ही हातावर वार करुन त्यांना गंभीर दुखापत करुन त्याचेजवळील रोख सहा हजार सातशे रुपये जबरदस्तीने चोरली आहे त्यांनी त्याबाबत वानवडी पोलीस स्टेशन पुणे येथे तक्रार दिलेली आहे.

आरोपींनी अशाप्रकारे पुणे शहरात वेगवेगळया ठिकाणी जबरी चोरी व वाहन चोरीचे एकुण आठ गुन्हे केल्याचे उघडकीस आलेले आहे गुन्हा करण्यासाठी वापरलेली रिक्षा, दोन कटर ब्लेड तसेच वेगवेगळया गुन्हयातील चोरलेली रोख रक्कम चौदा हजार रुपये व सहा वेगवेगळया कंपनीचे मोबाईल फोन, चार दुचाकी वाहने असा एकुण दोन लाख साठ हजार रुपयाचा माल हस्तगत करण्यात आलेला आहे.

मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी सहावे न्यायालय पुणे यांचे न्यायालयात आरोपींना हजर केले असता त्यांपस दिनांक - २६/१०/२०१७ रोजी पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिलेले आहेत.

सदर कामगिरी परिमंडळ १ पुणे चे पोलीस उपायुक्त श्री. प्रविण मुंडे, शहर विभाग पुणे चे सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. बाजीराव मोहीते यांचे मार्गदर्शनाखाली खडक पोलीस स्टेशन पुणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. राजेंद्र मोकाशी, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री संभाजी शिर्के, सहायक पोलीस निरीक्षक विष्णु केसरकर तपास पथकाचे पोलीस उपनिरीक्षक संजय गायकवाड व तपास पथकातील पोलीस कर्मचारी विश्वनाथ शिंदे, अनिकेत बाबर, अशिष चव्हाण, संदिप कांबळे यांनी केलेली आहे.